पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

# प्रेसनोट क्र. ५७ दिनांक १०/१०/२०२२

# पालघर पोलीसांकडून चोरीच्या गुन्ह्याची उकल करुन दोन आरोपींना जेरबंद. अर्धा किलो सोने हस्तगत करण्यात यश.

दि.३०/०९/२०२२ रोजी फिर्यादी नामे जिग्नेश दिपक बारी, रा. खटाळी, पो. केळवा, ता, जि. पालघर हे नवरात्रीच्या आरतीसाठी दांडाखाडी येथे गेले असतांना अज्ञात चोरट्याने राहते घराच्या बेडरुमचे बंद खिडकी उघडून घरात प्रवेश करुन घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण ६४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करुन चोरुन नेला म्हणून केळवा पोलीस ठाणे येथे दि.०१/१०/२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.नं. I ६५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३८०, ४५४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

केळवा परीसरातील वाढत्या चोरीचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांच्या आदेशान्वये श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक स्थागुशा पालघर व सपोनि/सतिश गवई, प्रभारी अधिकारी केळवा पोलीस ठाणे यांची वेगवेगळी तपास पथके तयार करुन सदर गुन्ह्याच्या तपासाबाबत सुचना दिल्या. त्या अनुषंगाने तपास पथके तयार करण्यात आली. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, यांनी सुरु केलेल्या जनसंवाद अभियानामुळे वरील नमूद गुन्ह्यात प्राप्त झालेले सिसिटिव्ही फुटेज मधील एक आरोपी हा स्थानिक नागरीकांच्या परीचयाचा असल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने कौशल्यपुर्ण तांत्रीक तपास करुन दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले.

त्याचप्रमाणे आरोपींकडून अधिक चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा. रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| ०१ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ०१/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४, ४५७ |
| ०२ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ०५/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| ०३ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I १३/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५७ |
| ०४ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I १७/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| ०५ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ४५/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४, ४५७ |
| ०६ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ५५/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४, ४५७ |

| | | |
|---|---|---|
| ०७ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ५९/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| ०८ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I १९/२०२२, भादविसं कलम ३८०, ४५७ |
| ०९ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I २९/२०२२, भादविसं कलम ३८०, ४५४, ४५७ |
| १० | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ३५/२०२२, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| ११ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ६५/२०२२, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| १२ | केळवा पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ६६/२०२२, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| १३ | सफाळे पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ८०/२०२१, भादविसं कलम ३८०, ४५४ |
| १४ | सफाळे पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ०८/२०२२, भादविसं कलम ३८०, ४५४, ४५७ |
| १५ | सफाळे पोलीस ठाणे | गु.र.क्र. I ४१/२०२२, भादविसं कलम ३८० |

नमुद गुन्ह्यात आरोपीत यांना अटक केली असून त्यांचेकडून एकुण १५,०८,६००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक स्थागुशा पालघर, सपोनि/सतिष गवई, प्रभारी अधिकारी केळवा पोलीस ठाणे, पोउपनि/सागर पाटील, स्थागुशा पालघर तसेच केळवा पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


THE SAFETY HONOUR AND WELFARE OF YOUR COUNTRY COME FIRST, ALWAYS AND EVERY TIME.
THE HONOUR WELFARE AND COMFORT OF THE MEN YOU COMMAND COME NEXT.
YOUR OWN EASE, COMFORT AND SAFETY COME LAST, ALWAYS AND EVERY TIME.
केळवा सागरी पोलीस ठाणे
गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल


पोलीस